# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात लागू करण्यात आलेल्या शिक्षण हक्क विधेयकामुळे अनेक शाळांमधील रिक्त पदांबाबत**

**(१) ३३८ (२२-१२-२०१४). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लागू करण्यात आलेल्या शिक्षण हक्क विधेयकामुळे अनेक शाळांमधील उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, ग्रंथपाल, लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचारी पदे रिक्त होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त झाल्याने अनेक शाळांतील कामे प्रलंबित राहण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे ज्या शांळामध्ये विद्यार्थी संख्या कमी झाली असेल तेथे मान्य पदसंख्या कमी होईल.
(२) (३) व (४) मा. प्रधान सचिव (शा.शि.व.क्री.) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने सुचविलेल्या शिफारशीनूसार दि. २८ ऑगस्ट, २०१५ चा संचमान्यतेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

**नदीचे खेडगाव (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील एच.बी.हायस्कुलमध्ये गुणपत्रक देतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पैसे घेतल्याची घडलेली घडना**

**(२) ७०५ (२२-१२-२०१४). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नदीचे खेडगाव (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील एच.बी.हायस्कुलमध्ये माहे जून २०१४ मध्ये वा त्यादरम्यान गुणपत्रक देतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पैसे घेवून शाळेच्या वर्गात मोठी मेजवानी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनमार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शाळेतील वर्गात मेजवानी करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी प्राथमिक चौकशीअंती दोषी आढळलेल्या मुख्याध्यापक तसेच दोन शिपाई यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ एक वर्षाकरिता रोखण्यात आली असून, ९ उपशिक्षक, १ वरिष्ठ लिपिक, १ प्रयोगशाळा सहाय्यक व १ प्रयोगशाळा परिचर यांना सक्त ताकीद देण्यात येऊन त्यांचेकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधूदूर्ग जिल्हयातील शाळांतील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत**

**(३) ८४६ (२२-१२-२०१४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधूदूर्ग जिल्हा प्राथमिक विभागस्तरावर प्राथमिक शिक्षकांना लागू केलेली त्रिस्तरीय वेतनश्रेणीची कार्यवाही चुकीच्या पध्दतीने सुरु असल्याने सर्व पदवीधर श्रेणीधारक शिक्षक निवडश्रेणीच्या लाभापासून वंचित राहिल्याचे तसेच जिल्हयातील शाळांचे व या शाळेतील शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून याबाबत चर्चा करण्याकरिता जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याने राज्य प्राथमिक शिक्षक समितीने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंशदायी पेंशन योजनेत समाविष्ट असलेल्या शिक्षकांच्या खात्यावर गत ५ वर्षे शासन रक्कम जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, जिल्ह्यातील शिक्षकांचे व शाळांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

निकषानुसार पात्र ठरलेल्या ४०४ प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) अंशदायी पेंशन योजनेच्या अंमलबजावणीवर मा. न्यायालयाची स्थगिती आहे.

---

**भंडारा जिह्यातील सातही तालुक्यातील शाळांमध्ये मागणी प्रमाणे निधी दिला नसल्याबाबत**

**(४) ४७०८ (२२-१२-२०१४). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सात तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळेमध्ये वर्ग खोल्यांचा व संरक्षण भिंतीचा अनुशेष आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य प्राथमिक सर्व शिक्षा अभियानामध्ये अनुशेष आहे व गत दोन वर्षात शासनाने सदर अनुशेष भरण्यासाठी मागणी प्रमाणे निधी दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने मागील दोन वर्षात वर्ग खोल्या व संरक्षण भिंतीसाठी मागणी प्रमाणे निधी दिला नसल्यामुळे मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी शाळेमधील भौतिक सुविधेच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासासोबत सर्वांगिण विकास होण्यास अडचण निर्माण झाली, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त बाबत शासनाने निधी उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मागील दोन वर्षात वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात ८० वर्ग खोली बांधकामे मंजूर झाली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१५-१६ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये Spillover म्हणून रु.३२१.१५ लक्ष इतका निधी मंजूर झाला आहे. तसेच १३ वा वित्त आयोग, वीआरजीफ योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या ४३ शाळांमध्ये संरक्षक भिंतीची कामे पूर्ण झाली असून ३५ शाळांमध्ये संरक्षक भिंत बांधकामाकरिता कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या वाढीव पदांना मान्यता मिळण्याबाबत

**(५) ५२८४ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील सन २००३-२००४ ते सन २०१० ते २०११ या वर्षांमधील शिक्षकांच्या वाढीव पदांना वेतनासह पायाभूत (शिक्षणसेवक) मान्यता मिळण्यासाठी शिक्षकांनी मागणी करुनही वाढीव पदांना वेतनासह मान्यता मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला, त्यानुषंगाने सदरहू शिक्षकांच्या पदांना उक्त कालावधीत वेतनासह मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील सन २००३-२००४ ते सन २०१० ते २०११ या वर्षांमधील ९३५ पदांना मान्यता देण्यात आली आहे. सदर पदांना वेतन अनुदान मंजूर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना वगळून नवीन शिक्षकांना सेवेत घेत असल्याबाबत**

**(६) ६३५८ (०९-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना वगळून नवीन शिक्षकांना सेवेत घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर शिक्षण विभागातील शिक्षक पदांना बेकायदा मान्यतेप्रकरणी चौकशी करण्यात येत असलेला अंतिम अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य कायम विनाअनुदानित कृति समितीचे उपाध्यक्ष व शिक्षक यांनी कोल्हापूर उपसंचालक कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारची कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.

(३) महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृति समितीने विविध मागण्यांसाठी जानेवारी, २०१५ मध्ये आंदोलन केले होते. तथापि, त्यामध्ये सदर मागणीचा समावेश नव्हता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: मुंबईमध्ये चण्याच्या डाळीच्या पिठाऐवजी ऑस्ट्रेलियन वाटाण्याचे पीठ बेसन म्हणून विक्री होत असल्याबाबत**

**(७) ७५३४ (०६-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईमध्ये सध्या बाजारामध्ये चण्याच्या डाळीच्या पिठाऐवजी ऑस्ट्रेलियन वाटाण्याचे पीठ बेसन म्हणून वापरले जात असून यामुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चणापिठाची विक्री करीत असतांना सांकेतिक भाषेचा वापर करीत असल्याने सामान्य नागरिकांना ही भाषा समजत नसल्याने ते भेसळयुक्त चण्याच्या ऐवजी वाटाण्याचे पीठ बेसन म्हणून खरेदी करतात व त्यामुळे नागरिकांना घशाचे आजार जडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात अशी कोणतीही बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाने राज्यात दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ या कालावधीत बेसन या अन्नपदार्थाचे एकूण १०५ नमूने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी ९९ नमुने प्रमाणित घोषित झाले असून, ६ नमुने कमी दर्जाचे आढळून आले. त्यापैकी २ प्रकरणी तडजोड होवून रु.२०.०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे व ४ प्रकरणांमध्ये कायद्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील लघु पाटंबधारे प्रकल्पांबाबत

**(८) ७६०० (०७-०४-२०१५). श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सरासरी ३,१४२ मि.मि. पाऊस पडला असला तरी एकुण सरासरी पैकी हा ७० टक्के असून धरणातील पाणीसाठा माहे जानेवारीमध्येच ५० टक्के आल्याने रायगड जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांच्या संख्येत २० टक्कयांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नवी मुंबई आणि मुंबईची तहान भागविणारा रायगड जिल्हा तहानलेलाच राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याला मुख्य कारण २५ लघु पाटबंधारे अपु-या अवस्थेत राहिले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर २५ लघु पाटबंधारे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासनाने ताडतीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ३१४२.६४ मि.मी. आहे. दिनांक १/६/२०१४ ते दिनांक ३१/१०/२०१४ पर्यन्त रायगड जिल्ह्यात २८३९.२३ मि.मी. इतके पर्जन्यमान झाले आहे. रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचेकडील २८ लघुपाटबंधारे योजनांचा संकल्पित उपयुक्त पाणीसाठा ६८.२६१ दलघमी इतका असून १७.१.२०१५ पर्यन्त सरासरी पाणीसाठा ६४.५४ टक्के इतका होता.

तसेच रायगड जिल्हा परिषदेकडील ७५ लघु पाटबंधारे योजनांचा एकूण उपयुक्त पाणीसाठा ७६०.२६ दलघमी इतकी आहे. जानेवारी, २०१५ मधील सरासरी उपलब्ध पाणीसाठा ६५ टक्के इतका होता.

रायगड जिल्ह्याच्या सन २०१३-१४ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यात ४४३ गावे व ९४३ वाड्या प्रस्तावित होत्या. टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत १५६ गावे व ३५० वाड्या प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रत्यक्षात ६६ गावे व २३१ वाड्या अशा एकूण २९७ गावे/वाड्यांना २ खाजगी व ३४ शासकीय अशा एकूण ३६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

रायगड जिल्ह्याच्या सन २०१४-१५ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यात ५८१ गावे व ९९५ वाड्या प्रस्तावित होत्या. त्यापैकी प्रत्यक्षात ६१ गावे व २३६ वाड्या अशा एकूण २९७ गावे/वाड्यांना गावे/ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार २ शासकीय व ३६ खाजगी अशा एकूण ३८ टँकरद्वारे माहे जानेवारी २०१५ ते दिनांक २१/६/२०१५ पर्यन्त पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळातील रोजंदार शिपाई यांना नियमित सेवेत समायोजन करुन घेण्याबाबत**

**(९) *८१८८* (०९-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळातील शिपाई यांना नियमित सेवेत समायोजन करुन घेण्याबाबत रोजंदार कर्मचारी कृती समिती, अमरावती यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०११ रोजी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ, अमरावती व मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना निवेदन दिले आहे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये मा.शिक्षण मंत्र्यांनाही निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरील कर्मचाऱ्यांना उक्त रिक्त पदी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत या कर्मचाऱ्यांना सामावून घेणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे अमरावती येथील अन्य रोजंदारी कर्मचारी यांनी सामावून घेणेबाबत मा. कामगार न्यायालय, अमरावती व मा. उच्च न्यायालय, नागपूर यांच्या अनुक्रमे दिनांक ९/१२/१९९६ व दिनांक ८/४/२००८ च्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (S.L.P.) दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. म्हणून सदर निवेदनामध्ये नमूद संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यांना रिक्त पदी सामावून घेण्याबाबत सध्या विचार करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहावर अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याबाबत

**(१०) ८३३० (०९-०४-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहावर दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी मध्यरात्री अज्ञात व्यक्तीने हल्ला केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहावर झालेला हल्ला हा तेथील कर्मचा-यांनी घडवून आणल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसतीगृहात अनेक दिवसांपासून कर्मचा-यांमध्ये अंतर्गत वाद अहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वसतीगृहावर झालेल्या हल्ल्याची चौकशी करण्यात आली आहे काय, वा चौकशीनुसार दोषी आढळणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या हल्ल्याबाबत वसतिगृहातील चतुर्थश्रेणी कर्मचारी संशयित आहे.

(३) नाही.

(४) वसतिगृहातील हल्ल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद करण्यात आलेली आहे. पोलीस स्टेशनमध्ये सदर तक्रारीच्या अनुषंगाने एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणानंतर विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, औरंगाबाद यांनी वसतीगृहास दिनांक २५.१.२०१५ रोजी भेट देवून चौकशी केली असून, वसतिगृह प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा पुरविल्या जात असल्याने विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्हा परिषदेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात पदमान्यतेत गैरप्रकार केल्याबाबत

**(११) ९२९४ (०९-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा परिषदेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात गेल्या ६ वर्षात संस्था चालक व शिक्षण अधिकाऱ्यांच्या संगनमताने पदमान्यतेत गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पुणे अथवा मुंबई येथील पथकाव्दारे चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांनी दिलेल्या चौकशीच्या अहवालावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## ठाणे येथील घोडबंदर किल्ला तसेच आजूबाजूच्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याबाबत

**(१२) १०६८५ (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील घोडबंदर किल्ला तसेच आजूबाजूच्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास होण्याकरिता तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लाकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास एका निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याच्या परिसरातील जमिन व त्यांचे सुशोभिकरण करुन देण्याबाबत निधी देण्याचे तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) मिरा भाईंदर महानगरपालिकेने सल्लागार आर्कीटेक्ट नेमून स्थळ पाहणी करुन सुशोभिकरण आराखडा तयार केला आहे. तसेच महानगरपालिकेने सदर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याची विनंती जिल्हाधिकारी ठोणे यांना केली आहे. त्यानुसार दिनांक ०९.०९.२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे आयोजित बैठकीत सर्वप्रथम घोडबंदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचे ठरले. त्यानुसार संचालक पुरातत्व यांनी सदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतच्या प्राथमिक अधिसूचनेचा प्रस्ताव दिनांक ०१.१०.२०१५ रोजी शासन मान्यतेस सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कासोदा (ता.एरंडोल,जि.जळगांव) येथील तात्पुरत्या नळपाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१३) ११६६२ (०७-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे खासबाब म्हणून मंजूर झालेल्या तात्पुरती नळपाणी पुरवठा योजनेच्या (टीपीडब्ल्यूएस) कामाची प्रगती व सद्यःस्थिती काय आहे,
(२) असल्यास, सदर योजनेवर किती खर्च करण्यात आला व या योजनेतून गावास पाणीपुरवठा करण्यात येत आहे काय तसेच सदर योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-१०-२०१५) :** (१) मौजे कासोदा (ता.एरंडोल,जि.जळगाव) येथे मंजूर झालेल्या तात्पुरती नळपाणी पुरवठा योजनेची (टीपीडब्ल्यूएस) कामे पूर्ण झालेली आहेत.सदर योजनेद्वारे मौजे कासोदा गावास दि.२.१०.२०१४ रोजी पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. परंतू ग्रामपंचायतीने योजना हस्तांतरित करुन न घेतल्यामुळे योजनेद्वारे होणारा पाणी पुरवठा बंद करण्यात आलेला होता. सद्य:स्थितीत दि.७.४.२०१५ पासून पुन्हा गावास पाणी पुरवठा सुरु आहे.
(२) योजनेवर रु.६४.३३ लक्ष एवढा खर्च झालेला असून व रु.७.२९ लक्ष इतक्या रकमेची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. या योजनेद्वारे दि.७.४.२०१५ पासून पुन्हा गावांस पाणी पुरवठा सुरु आहे. सदर योजनेच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उच्च माध्यमिक विभागातील ९२६ मान्यताप्राप्त पदांच्या**
**वेतनासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(१४) १५८९३ (०९-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक विभागातील ९२६ पदांना मान्यता दिली असतानाही या पदांच्या वेतनासाठी माहे मे, २०१४ मध्ये शासनाने आजमितीस निधीची तरतूद न केल्यामुळे सदरहू पदांवर कार्यरत असलेल्या शिक्षकांना तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिक्षकांच्या वेतनासाठी विनाविलंब निधीची तरतूद करण्यात यावी यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे अलिकडेच मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पदांना शासनाने मान्यता दिल्यानंतरही वेतनासाठी आजमितीस निधींची तरतूद न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू मान्यता प्राप्त ९२६ शिक्षक पदांवर कार्यरत असलेल्या शिक्षकांना विनाविलंब मागील थकबाकीसह वेतन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाने या पदांबाबतची अधिक माहिती मागविली आहे.

(४) क्षेत्रिय यंत्रणेकडून अनुषंगिक माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील १४ तालुक्यातील पाण्याच्या**
**पातळीत १ ते ३ मीटरने घट झाल्याबाबत**

**(१५) १६३९० (१७-०९-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील १४ ही तालुक्यातील पाण्याची पातळी गत वर्षापेक्षा १ ते ३ मिटरने कमी झाल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये सर्वेक्षण विभागाने केलेल्या निरीक्षणानुसार आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच वर्षाच्या तुलनेत माहे जानेवारी, २०१५ च्या अखेरीस जिल्ह्याच्या पाणीपातळीत मोठी घट झाल्याने माहे मार्च, २०१५ मध्ये पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्याधुनिक पध्दतीने ठिबक अथवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर न करता पारंपरिक पध्दतीने शेतीला पाणी देण्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा केला जात असून शेततळ्यांची संख्या वाढली असून, शेत तळ्यांमध्ये पाणी साठविताना प्लास्टिकचा वापर केला जात असल्याने जमिनीत पाणी मुरत नसल्याने भूजल पातळी वेगाने कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी संचालक, भूजल सर्वेक्षण यांना पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार भूजल पातळी वाढविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील एकूण १९२ निरीक्षण विहिरींच्या भूजल पातळीचा अभ्यास केला असता माहे मार्च, २०१५ मधील पाणी पातळीचा मागील ५ वर्षाच्या माहे मार्च मधील पाणी पातळीशी तुलानात्मक अभ्यास केल्यानंतर एकूण ६२ निरिक्षण विहिरींमध्ये १ मी. पेक्षा जास्त पाणी पातळीत घट झाल्याचे आढळून येत आहे.
(२) हे खरे नाही.

अहमदनगर जिल्ह्यासहित पूर्ण राज्यामधील सर्व निरीक्षण विहिरींचा माहे ऑक्टोबर, जानेवारी, मार्च व मे महिन्यामध्ये भूजल पातळीचा नियमित अभ्यास केला जातो.
(३) शासनामार्फत विविध योजनांतर्गत ठिबक अथवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर करण्याकरिता प्रोत्साहन दिले जाते. भूगर्भात भूजलाचे जास्तीत जास्त पुनर्भरण होण्याकरिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) व जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासन विभागातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) १६६१६ (०६-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील तब्बल एक कोटी पंचवीस लाख नागरीकांना सुरक्षित अन्न मिळावे याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनाला (एफडीए) २०० अन्न सुरक्षा अधिका-यांची

गरज आहे, परंतु फक्त १९ अधिका-यांवरच ही जबाबदारी असल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि बृहन्मुंबई विभागात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची ५७ पदे मंजूर असून त्यापैकी २० पदे भरलेली आहेत तसचे मुख्यालयात १७ पदांपैकी ११ पदे कार्यरत आहेत.
(२) व (३) अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गातील ४८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यानुषंगे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेल्या मागणीपत्रानुसार, दि.०६.०८.२०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द झालेली आहे व अनुषंगिक कार्यवाही आयोगाकडून करण्यात येत आहे.
तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील ३३ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना प्रशासनात सामावून घेण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्यानुसार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदतर्फे घेतल्या जाणा-या ४ थी व ७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेच्या मराठी, इंग्रजी व ऊर्दु माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेत चुका असल्याबाबत**

**(१७) १६६१७ (०६-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदतर्फे घेतल्या जाणाऱ्या ४ थी व ७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेच्या मराठी, इंग्रजी व ऊर्दु माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेत चुका असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने असे प्रकार वारंवार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) होय.
(२), (३) व (४) प्रश्नपत्रिकेची छपाई करतांना मुद्रण दोषामुळे व उत्तराच्या पर्यायात झालेला बदल यामुळे चुका झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने प्रश्नपत्रिका छपाई करणाऱ्या संस्थेवर दंडात्मक कारवाई वसुलीसह करण्यात आली आहे.

---

### पंढरपूर (जि.सोलापूर) येथे बनावट पत्रकार स्थानिक व्यापा-यांकडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करीत असल्याबाबत

**(१८) १६६९४ (०६-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे काही बनावट पत्रकार अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींचा चुकीचा अर्थ सांगून संबंधीत अधिका-यांच्या समक्ष स्थानिक व्यापा-यांकडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करण्यात येत असल्याचे लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी यांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदेड येथील वृध्द कलावंताचे प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१९) १६९३८ (३०-०७-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथे शासनाचे मानधन मिळण्यासाठी जिल्हास्तरावर असलेल्या निवडसमितीवर मागील दोन वर्षापासून अध्यक्ष नसल्याने जिल्हपरिषदेच्या समाजकल्याण विभागात वृध्द कलावंताचे प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे तसेच त्यांची हेळसांड होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पात्र ६० कलावंतांची यादी शासनास प्राप्त झाली असून सदर कलावंतांना मानधन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये निवड समितीचा कार्यकाल संपल्यामुळे त्या आर्थिक वर्षात कलावंतांची निवड झाली नाही.
(२) मा.पालकमंत्री, नांदेड यांच्याकडे समिती पुनर्गठित करणेबाबत जिल्हापरिषद नांदेड यांचा पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथे वैयक्तीक शौचालय बांधकामाच्या अनुदानाची**
**रक्कम देण्यास दिरंगाई होत असल्याबाबत**

**(२०) १७१३६ (१७-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथे गोरगरीब जनतेने व्याजबट्याने, उसनवारीने पैसे घेऊन घरी वैयक्तीक शौचालय बांधकाम केल्यानंतर आता त्यांना अनुदानाची रक्कम देण्यासाठी काही गटविकास अधिकारी आर्थिक सौदेबाजी करीत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) भाग १ बाबत चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारित करुन रु.१२,०००/-- इतके करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत एकूण १३०९ ग्रामपंचायती असून दिनांक ३१.३.२०१५ अखेर एकूण ५५,७५७ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. तसेच मार्च, २०१५ नंतर सप्टेंबर, २०१५ पर्यंत आणखी २७,५४६ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण ८३,३०३ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. त्यापैकी ३९,४३९ लाभार्थ्यांना निधीचे वाटप करण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेस सन २०१५-१६ मध्ये (माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत राज्य हिश्श्यासाठी रु.३६६.०० लक्ष व केंद्र हिश्श्यासाठी रु. १९०८.६१ लक्ष असे एकूण रु.२२७४.६१ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(२१) १७३६८ (२९-०७-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गांवामध्ये तीव्र पाणीटंचाई सुरु असून प्रशासनाच्या उदासिन यंत्रणेमुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चोराची वाडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) गट ग्रामपंचायतीमार्फत सुरु करण्यात आलेल्या नळपाणी पुरवठा योजनेचे काम व पाण्याच्या टाकीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून पाण्याची टाकी कोणत्याही क्षणी कोसळण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने येथील तीव्र पाणी टंचाई दूर करण्यासाठी व पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या दुरुस्तीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान श्रीगोंदा तालुक्यातील ४ ग्रामपंचायतीकडून टँकर मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार ४ गावे व ६९ वाड्या वस्त्यांमधील १८०५० इतक्या लोकसंख्येसाठी १० टँकरद्वारे नागरिकांना पिण्याचे पाणी पुरविण्यात आले आहे.

(२) मौजे चोराचीवाडी, ता.श्रीगोंदा ग्रामपंचायतीमार्फत नळ पाणी पुरवठा योजनेचे व पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झालेले असून पाण्याची टाकी कोसळण्याची शक्यता नाही.

(३) मौजे चोराचीवाडी येथील नळ पाणी पुरवठा योजनेची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनुसार पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या दुरुस्तीची आवश्यकता भासलेली नाही. मौजे चोराचीवाडी गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यामध्ये अन्न व औषधी प्रशासन कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२२) १७४५८ (०६-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये अन्न व औषधी प्रशासन कार्यालय अद्याप सुरु झाले नसल्याने भेसळयुक्त पदार्थांमुळे येथील सर्वसामान्यांना आरोग्याचे प्रश्न भेडसावत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यातील भेसळयुक्त पदार्थाची विक्री रोखण्यासंदर्भात येथे अन्न व औषधी प्रशासन यंत्रणा कार्यान्वित करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-१०-२०१५) :**(१) हिंगोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र कार्यालय अस्तित्वात नसून परभणी कार्यालयाकडून हिंगोली जिल्ह्याचे कामकाज नियंत्रित केले जाते. मात्र त्यामुळे सर्वसामान्यांना आरोग्याचे प्रश्न भेडसावत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) परभणी येथे असलेल्या अधिकाऱ्यांमार्फत हिंगोली जिल्ह्यात नियमित तपासण्या करण्यात येवून नमूने विश्लेषणासाठी घेतले जातात व नियमानुसार कार्यवाही केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील विमानगरमधील आनंद विदयानिकेतन विद्यालयातील शिक्षकाने इयत्ता दहावीच्या हिंदी विषयाच्या उत्तरपत्रिका नववीतील मुलांकडून तपासून घेतल्याबाबत**

**(२३) १७६५६ (०६-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील विमानगरमधील आनंद विदयानिकेतन विद्यालयातील शिक्षकाने इयत्ता दहावीच्या हिंदी विषयाच्या उत्तरपत्रिका नववीतील मुलांकडून तपासून घेतल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) शासनाने यासंदर्भात चौकशी केली असून संबंधित शिक्षकाला निलंबीत करण्यात आले होते. चौकशी अंती वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरीता रोखण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथील जेएसडब्ल्यू एनर्जी कंपनीने पर्यावरण विषयक कायद्याचे उल्लंघन करुन इमारतीचे केलेले बांधकाम**

**(२४) १८३७२ (३१-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील जेएसडब्ल्यू एनर्जी कंपनीने पर्यावरण विषयक कायद्याचे उल्लंघन करुन ३६ हजार चौरस मीटरपेक्षा जास्त आकाराची इमारत बांधली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी कंपनी तसेच सदर बांधकामाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०३-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) उपरोक्त १ च्या अनुषंगाने, सदर कंपनीने पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरहू कंपनीविरोधात प्रथम वर्ग दंडाधिकारी रत्नागिरी येथे दिनांक १५/४/२०१५ रोजी खटला दाखल केला व मा. न्यायालयाने उक्त कंपनीस रु.४५०००/- रकमेचा दंड ठोठावला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात टरबूज, खरबूज, केळी आणि आंबे कृत्रिमरित्या पिकवून विक्री होत असल्याबाबत**

**(२५) १८८६२ (०६-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात टरबूज, खरबूज, केळी आणि आंबे कृत्रिमरित्या पिकवून विक्री होत असल्याने फळे खाणा-यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच बाजारात येणारे आंबे घातक रसायनांद्वारे पिकवून ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्यांवर भा.दं.वि.च्या कलम ३२८ नुसार विषप्रयोगाचे अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे अन्न व औषधी प्रशासनाचे सह आयुक्त यांनी माहे मार्च-२०१५ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई, ठाणे, पुणे इत्यादी बाजार पेठांमध्ये रसायनयुक्त पिकविलेल्या आंब्यांची सर्रास विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कृत्रिमरित्या पिकविलेल्या फळांची विक्री होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.
(४) कृत्रिमरित्या पिकविलेल्या फळांची विक्री होऊ नये म्हणून अन्न व औषध प्रशासनातील सर्व विभागात आंबे विक्रेते, व्यापारी संघटना यांच्या बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात येते तसेच वेळोवेळी फळांचे नमुने घेऊन विश्लेषण करण्यात येते. अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात. सन २०१४-२०१५ या कालावधीत एकूण २९ प्रकरणात खटले दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नद्यांच्या जलशुध्दीकरणासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२६) १८८७३ (३१-०७-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नद्यांची जलप्रदूषणातून सुटका करण्यासाठी राज्य शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान उपाययोजना आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत राज्यातील किती नद्यांचे जलप्रदूषणातून सुटका करण्यात आली आहे तसेच उर्वरित नद्यांचे जलशुध्दीकरण केव्हापर्यंत अपेक्षित आहे,
(३) असल्यास, नद्यांच्या जलशुध्दीकरणासाठी शासनाने किती खर्च केला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०३-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
तथापि, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सर्व महानगरपालिकांना शहरामधुन निर्माण होणाऱ्या सांडपाणी व घनकचाऱ्याच्या प्रक्रियेसाठी यंत्रणा उभारणे इत्यादी कामाकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मूळ अंदाज पत्रकापैकी २५% निधी हा पर्यावरणीय पायाभूत सुविधा तयार करुन त्या वापरणे, रखरखाव करणे इत्यादी साठी राखीव ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे शहरातून निघणाऱ्या सांडपाणी/घनकचऱ्यांमुळे होणाऱ्या राज्यातील नद्यांचे प्रदुषण रोखण्यासाठी मदत होणार आहे.
(३) राज्यातील २६ महानगरपालिकांपैकी २३ महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पिय बैठकीमध्ये २५% रक्कमेची तरतूद ही सांडपाणी नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी करण्याबाबतचा ठराव पारीत केल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील तसेच कोकणातील दशावतार नाट्य आणि कला तसेच भजन यातील वृध्द कलाकारांना मानधन देण्याबाबत

**(२७) १८९३३ (०६-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच विशेषत: कोकणातील दशावतार नाट्य आणि कला तसेच भजन, जाखंडीनृत्य कलाकार या सारख्या कलेसाठी आपले आयुष्य वेचले अशा या वृध्द कलाकारांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने हातभार लावण्याकरिता शासनाने वृध्द कलाकार मानधन योजना आखली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वृध्द कलावंतांना मानधन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी,दिंडोशी यांनी दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना एक लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोकणातील किती वृध्द कलाकारांना मानधन देण्यात आले आहे, ज्या वृध्द कलाकारांना मानधन देण्यांत आले नाही त्यांना केव्हा देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर योजनेचा लाभ मिळण्याबाबत व निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासनामार्फत कोकणातील २,७३२ पात्र वृध्द कलाकारांना मानधन देण्यात येत आहे. दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात ६० इष्टांकाच्या मर्यादेत वृध्द कलावंतांची निवड जिल्हा निवड समितीमार्फत केली जाते. ज्या कलाकारांना मानधन अद्याप मिळालेले नाही, त्यांना मानधन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.सदस्यांकडून प्राप्त झालेल्या निवेदनास योग्य ते उत्तर देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे)येथील वालधुनी नदीत दूषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे नदीचे पाणी दूषित झाल्याबाबत

**(२८) १९०१५ (३१-०७-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत**

**गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीत अंबरनाथ, बदलापूर एमआयडीसी येथील कारखान्यातील तसेच सदर जिल्ह्यातील कॅम्प ५ येथील सुमारे ४५० जिन्सवॉश कारखान्यातील रसायन मिश्रित दूषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे नदीतील पाणी दूषित झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून तेथील नागरिकांना आजार होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आहे व तदनुसार संबंधित कारखान्यांविरुध्द तसेच प्रदूषण मंडळाच्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०३-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

माहे मे, २०१५ व त्या दरम्यान अशाप्रकारची तक्रार म.प्र.नि.मंडळास प्राप्त नाही. तथापि डिसेंबर, २०१३ दरम्यान म.प्र.नि.मंडळाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये उल्हानगर कॅम्प नं.५ येथे २०५ प्रदूषणकारी जिन्सवॉश कारखाने आढळून आलेले होते.

(२) होय.

मा.राष्ट्रीय हरित लवाद पुणे यांच्या दिनांक ०२/०७/२०१५ च्या आदेशानुसार विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीमार्फत उल्हास नदीच्या प्रदुषण नियंत्रणाकरिता कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

(३) व (४) होय.

म.प्र.नि. मंडळाने उल्हास नगर कॅम्प नं. ५ परिसरातील २०५ कारखान्यांना बंदचे आदेश (पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडण) पारीत केलेले आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेने एकूण ३२ उद्योगांचे पाणी पुरवठा खंडीत केलेला असून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने ११० उदयोगांचा विदयुत पुरवठा खंडीत केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांस्कृतिक कार्य संचालनालयाने व्यवसायिक राज्य नाट्य स्पर्धा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(२९) १९४४५ (१६-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांस्कृतिक कार्य संचालनालयाने चालू वर्षी व्यावसायिक राज्य नाट्य स्पर्धा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्य स्पर्धा रद्द करण्याची कारणे काय आहेत, चालू वर्षीच नाट्य स्पर्धा आयोजित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर नाट्य स्पर्धा कधीपर्यंत आयोजित केल्या जातील,
(४) नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व्यावसायिक राज्य नाटय स्पर्धा आयोजना करिता किमान २० प्रवेशिका प्राप्त न झाल्याने ही स्पर्धा रद्द करण्यात आली.
(३) सदर स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन फेब्रुवारी व मार्च, २०१६ या कालावधीत व अंतिम फेरीचे आयोजन एप्रिल, २०१६ मध्ये प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जैतापूर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील कन्याशाळेची इमारत बंद असल्याबाबत**

**(३०) १९५९१ (०६-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जैतापूर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे गेल्या अनेक वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या कन्याशाळेची इमारत सध्या बंद अवस्थेत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत बंद अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) कन्या शाळा जैतापूर या शाळेचे सदर शाळेपासून जवळच असलेल्या जीवन शिक्षण शाळा जैतापूर शाळा नं.१ या शाळेत सन १९७४ मध्ये विलिनीकरण झाले. कन्या शाळेतील विद्यार्थीनींचे जीवन शिक्षण शाळेत समायोजन झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (ता.कल्याण,जि.ठाणे) येथील दुर्वेश रासायनिक कंपनीतून होणारे प्रदूषण**

**(३१) १९९३० (३१-०७-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील डोंबिवली (ता.कल्याण,जि.ठाणे) जवळील पेंढारकर महाविद्यालयाशेजारी असणाऱ्या दुर्वेश रासायनिक कंपनीतून कोणतीही प्रक्रिया न करताच प्रदूषित वायू सोडण्यात येत असल्याची घटना दिनांक ७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कपंनीची प्रदूषण नियंत्रण महामंडळाने पाहणी करून कंपनी बंद करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण (जिल्हा) यांच्या शिघ्र कृती दलाने दिनांक ५ मे, २०१५ रोजी डोबिंवली परिसरातील औद्योगिक परिसराची पाहणी केली असता मे.दूर्वेश रासायनिक प्रा.लि. या कंपनीतून उग्र स्वरुपाचा वास येत असलेला वायू उत्सर्जित होत असल्याचे आढळून आले होते.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी वरील घटनेची तात्काळ दखल घेऊन उक्त कारखान्यास उत्पादन बंद करण्याची नोटीस बजावली आहे. सद्य परिस्थितीत कारखान्याने उत्पादन बंद केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील इ.१ ली ते ४ थी मधील बीपीएल विद्यार्थ्यांना पुरवठा होणाऱ्या गणवेश दरात वाढ करण्याबाबत**

**(३२) २०४२७ (०६-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इ.१ ली ते ४ थी मधील बीपीएल विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या दरात वाढ करण्याबाबत दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ ते २५ फेब्रुवारी, २०१४ दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी शासनाकडे लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) व(२) राज्य शासनाच्या मोफत गणवेश वाटप योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिविद्यार्थी एक गणवेशासाठी मुलांकरिता रु.५७/-आणि मुलींकरिता रु.६९/-इतका दर मंजूर आहे. सदर दरात वाढ करुन प्रतिविद्यार्थी रु.२००/- इतका दर करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खांबा-नेहेरवाडी कुंड (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे अन्नातून विषबाधा झाल्याने तीन जणांचा झालेला मृत्यू**

**(३३) २०८६७ (०६-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांबा-नेहेरवाडी कुंड (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे डोंगराळ टेकडीवर राहणाऱ्या रोहिदास शिंदे आणि यांच्या कुटुंबियांना अन्नातून विषबाधा झाल्याने तीन भाऊ बहिणींचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे, तथापि, सदर मृत्यू अन्नातील विषबाधेमुळे झाला याबाबत अहवाल प्राप्त झालेला नाही.

(२) सदर प्रकरणात पोलिसांसह तपास करण्यात आला असून,प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, लोणी यांच्या अंतिम अहवालानुसार सदर मृत्यू हा Gastroeneteritis मुळे झाल्याचे नमूद केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये तसेच अहमदनगर जिल्हयामध्ये सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण झाले नसल्याबाबत**

**(३४) २०९०३ (२९-०७-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (अ) शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूक्यूएम-२०१०/प्र.क्र.१९०/पापु-१२ मंत्रालय, मुंबई दिनांक २९ ऑगस्ट, २०१२, (ब) शासन शुध्दीपत्रक क्रमांक डब्ल्युक्युएम-२०१०/प्र.क्र.१९०/पापु-१२ मंत्रालय, मुंबई दिनांक १० ऑक्टोबर, २०१२, अन्वये प्रत्येक जिल्हयात दिनांक १ एप्रिल, २०१४ ते ३० एप्रिल, २०१४ या कालावधीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करावे, असे आदेश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतर जिल्हयांमध्ये तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष जिल्हा परिषद कार्यालय ता.संगमनेर, जि.अहमदनगर येथे दिनांक १ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३० एप्रिल, २०१४ या कालावधीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या जिल्हा परिषदांनी सर्वेक्षण केले नाही,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करवाईचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०९-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) दिनांक १ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३० एप्रिल, २०१४ या कालावधीत सर्व जिल्ह्यातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

---

## नागपूर शासकीय आयुर्वेद रूग्णालयातील एक्स-रे यंत्र दुरूस्तीबाबत

**(३५) २११३९ (१४-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय आयुर्वेद रूग्णालयातील एक्स-रे यंत्र दुरूस्तीचा प्रस्ताव ६महिन्यापासून आयुष संचालनालय इथे विना कारवाई पडलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुष संचालनालय शासकीय आयुर्वेद रूग्णालय, नागपूर येथील विविध प्रस्तावावर अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक्स-रे मशीन दुरूस्तीकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय. पोर्टेबल एक्स रे मशीन रुपये ३४,८७५/-खर्चून दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

तसेच या विभागाच्या शासन पत्र दिनांक ०३/०७/२०१५ नुसार शासकीय आयुर्वेद रुग्णालय नागपुर यांचे कार्यालयातील क्ष-किरण यंत्रासाठी लागणारा डह-एक्स -३०० कंट्रोल हा सुटा भाग रु.२,५३,१२५/- एवढया किंमतीस खरेदी करण्यांस व त्यासाठी लागणारा खर्च अधिष्ठातांचे स्वीय प्रपंजी खात्यातून भागविण्यास मंजूरी दिली आहे. सदर यंत्र दिनांक २०/०७/२०१५ रोजी दुरुस्ती करण्यांत आले असून, सद्यस्थितीत उपरोक्त दोन्ही एक्स रे मशीन कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिमुर व नागभिड (जि.चंद्रपूर) तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी (CSR ATM) संयंत्रे बसविणे बाबत

**(३६) २१४०२ (२९-०७-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमुर व नागभिड (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०१५ च्या प्रखर उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाल्यामुळे फ्लोराईडयुक्त भागामध्ये शासनाद्वारा उभारण्यात

येणा-या अकोला अर्बन बँकेद्वारा पुरविण्यात आलेल्या शुध्द पिण्याच्या पाण्यासाठी (CSR ATM) संयंत्र बसवुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीने जिल्हा प्रशासनास दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी वा त्यासुमारास विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी केलेले हातपंपावरील शुध्द पिण्याच्या पाण्याच्या संयत्रास (CSR ATM) जिल्हा प्रशासनाने मंजुरीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-१०-२०१५) :** (१), (२) व (३) चिमूर व नागभिड (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०१५ च्या प्रखर उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाल्यामुळे फ्लोराईडयुक्त भागामध्ये शासनाद्वारा उभारण्यात येणाऱ्या अकोला अर्बन बँकेद्वारा पुरविण्यात आलेल्या शुध्द पिण्याच्या पाण्यासाठी (CSR ATM) संयंत्र बसवून देण्याबाबत १ एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास जिल्हाप्रशासनास विनंती पत्र/प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे जिल्हाप्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

---

**पेण (जि.रायगड) येथील आईस्क्रीम दुकानातून खरेदी**
**केलेल्या आईस्क्रीममुळे झालेली विषबाधा**

**(३७) २१७६६ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील आईस्क्रीम दुकानातून खरेदी केलेल्या आईस्क्रीममुळे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पेण शहरातील नागरीकांना आईस्क्रीम खाल्याने विषबाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने तक्रारी अर्ज केल्यानंतर सदर दुकानावर धाड टाकून मुदतबाह्य झालेले आईस्क्रिम जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक परवाना नसलेल्या संतोष आईस्क्रीम दुकानमालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, तक्रार प्राप्त झाल्यानंतर रायगड कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी मे, संतोष आईस्क्रिम सेंटर, वडगाव रोड, चिंचपाडा, ता. पेण, जि.रायगड या पेढीची तपासणी करुन “मिडीयम फॅट फ्रोजन डेझर्ट मँगो संडे” या अन्न पदार्थाचा सर्व्हेक्षणासाठी नमुना घेतला होता. सदर नमुना प्रमाणित घोषित झाला आहे.

तसेच, पुरवठादार पेढी मे.दिबाह एन्टरप्रायझेस, पेण यांच्या वाहनाची तपासणी करुन “मिडीयम फॅट फ्रोजन डेझर्ट मँगो संडे” या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित साठा एकूण १२ बॉक्स किंमत रु.३,३६०/- चा साठा विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात आला होता. तथापि, विश्लेषणासाठी घेतलेला नमुना प्रमाणित घोषित झाल्याने प्रतिबंधित साठा विक्रेत्यास खुला करण्याचे आदेश देण्यात आले.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या तपासणी दरम्यान, तक्रारी व्यतिरिक्त आढळून आलेल्या अन्य त्रुटींच्या अनुषंगाने, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी कलम ६९ अंतर्गत तडजोड अर्ज दाखल केला होता सदर प्रकरणी सुनावणी होवून पेढीस रु. १०,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत फ्लोराईडयुक्त असल्याबाबत**

**(३८) २२१६१ (०६-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात फ्लोराईड व नायट्रेडचे प्रमाण असलेले स्त्रोत असल्याचे व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या स्त्रोतांची रासायनिक तपासणी सन २००५ मध्ये करण्यात आली असल्याचे लेखी उत्तर मा.पाणीपुरवठा मंत्री यांनी दिनांक ७ मे, २०१५ चे क्र. कपासू-१४१३/प्र.क्र.१२२/पापू-१३ अन्वये स्थानिक लोप्रतिनिधी यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक तपासणी सन २००५ ते २०१५ याकालावधीत पुन्हा करण्यात आली आहेत व १ हजार ८३६ गावापैंकी ९५२ गांवे फ्लोराईडयुक्त पाणी पुरवठा होणारी असल्याची धक्कादायक माहिती निरक्षण भूजल विभागाच्या सर्वेक्षणाकडून माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आणि सदर गावांतील नागरिकांचे दात पिवळे पडणे, हातपाय वाकडे होणे, हाडे कमजोर पडणे, चेहऱ्यावर व्यंगत्व येणे आदि आजार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील माहे १ ऑक्टोबर ते फेब्रुवारी पर्यंत करण्यात आलेल्या८२८० जलस्त्रोतांच्या पाणी नमुने सर्वेक्षणात ४७१ जलस्त्रोत फ्लोराईडने बाधीत आहे, ३८२२ जलस्त्रोत नायट्रेट अधिक असल्याचे दिसून आले, १०९ जलस्त्रोतात अल्केलिटी तर ६३० जलस्त्रोतात टीडीएस, ३५७ जलस्त्रोतात अल्केलिटी तर ६३० जलस्त्रोतात पाण्याची कठिणता आढळून आली आहे, त्यामुळे विविध प्रकारच्या शारिरीक रोगांनी आजारी होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे उद्भवणाऱ्या आजाराला आळा घालण्याकरिता व शुध्द पाण्याचा मुबलक पुरवठा करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०९-२०१५) :** (१) होय.
(२) चंद्रपूर जिल्हयातील ११२८० स्त्रोतांच्या पाण्याच्या नमुन्यांपैकी ३७२ गावांतील ९५२ पाण्याच्या स्त्रोतामध्ये फ्लोराईड आढळून आले आहे. त्यामुळे सदर गावांतील नागरिकांचे दात पिवळे पडणे, हातपाय वाकडे होणे, हाडे कमजोर पडणे, चेहऱ्यावर व्यंगत्व येणे आदि आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) यवतमाळ जिल्हयातील पाणी नमुन्यांचे रासायनिक तपासणी अभियान माहे १ ऑक्टोबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ पर्यंत करण्यात आलेले आहे.अभियानामध्ये ८२८० जलस्त्रोतांची रासायनिक तपासणी करण्यात आली व त्यामध्ये फ्लोराईड अधिक असलेले ४७१ नायट्रेड अधिक असलेले ३८२२, अल्केलिटी अधिक असलेले १५७,टीडीएस अधिक असलेले ८१ कठीणता अधिक असलेले ६३० जलस्त्रोत दुषित आढळून आले आहेत.

जिल्हयातील दुषित पाणी नमुने आढळून आलेल्या गावामध्ये शारिरीक रोगांनी आजारी रुग्णांच्या संख्येमध्ये कुठल्याही प्रकारची वाढ आढळून आलेली नाही. तसेच जिल्हयात फ्लोराईड अधिक असलेल्या गावातील फ्लोरोसिसग्रस्त रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) व (५) चंद्रपूर जिल्हयात वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी ११२८० स्त्रोतांची रासायनिक तपासणी केली त्यानुसार ३७२ गावांच्या ९५२ स्त्रोतांमध्ये फ्लोराईड आढळून आले. ३७२ गावापैकी ३१५ गावात स्वतंत्र नळ योजना, प्रादेशिक नळ योजना व सौर उर्जा दुहेरी पंपद्वारा पाणी पुरवठा होत आहे. उर्वरीत ५७ गावापैकी १६ गावे सन २०१३-१४ च्या आराखडयात असून प्रगतीपथावर आहे व १२ गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या कृती आराखडयात व १० गावे जलस्वराज्य टप्पा-२ च्या आराखडयात समाविष्ट करण्यात आलेले आहे. उर्वरित १९ गावात इतर हातपंप व विहीरीद्वारे शुध्द पाणी पुरवठा होत आहे. पाणी पुरवठा योजना असलेल्या १७ गावामध्ये नळ योजनेचे स्त्रोत फ्लोराईडबाधीत आहे. सदर गावांना शुध्द पाणी पुरवठा होण्याचे दृष्टीने उपाय योजना करावयाचे प्रस्तावित आहे.

यवतमाळ जिल्हयातील विविध घटकांनी रासायनिक दृष्टया दुषित आढळलेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे पर्यायी स्त्रोत उपलब्ध असून त्याद्वारे मुबलक प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु आहे.

---

**राज्यातील तेरा जिल्ह्यात भूजलातील पाण्याचा प्रचंड उपसा झाल्याने सदर भाग अतिशोषित पाणलोट क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत.**

**(३९) २२३१७ (१४-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर, नगर, औरंगाबाद, अमरावती, बुलडाणा, जळगांव, जालना, लातूर, उस्मानाबाद व नाशिक या तेरा जिल्ह्यात भूजलातील पाण्याचा प्रचंड उपसा झाल्याने हा भाग अतिशोषित पाणलोट क्षेत्रात समाविष्ट झाला असून याकरिता राज्यात भूजल विकास आणि व्यवस्थापन अधिनियम गेल्या वर्षापासून अमलात येवूनही कायद्याची नियमावलीच तयार झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दर वर्षी भूजलपातळीत मोठी घट होत असल्याने त्यावर नियंत्रण आणण्याकरिता सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांमध्ये खोलवर खोदल्या जाणाऱ्या विंधन विहिरींवर (बोअरवेल) निर्बंध आणण्याच्या मागणीचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे.

भूजल अंदाज अहवालानुसार सदर १३ जिल्ह्यातील ७६ पाणलोट क्षेत्रे अतिशोषित व ४ पाणलोट क्षेत्रे शोषित या वर्गवारीत समाविष्ठ आहेत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ हा दि.०१०६.२०१४ पासून राज्यात अंमलात आलेला आहे. या अनुषंगाने, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ अंतर्गत नियमांचा मसुदा तयार करण्यात आला असून, सदर मसूदा अंतिम करण्यासाठी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. आपना-२०१४/प्र.क्र. १९६/ पापु-१५, दि.११.०८.२०१५ अन्वये समिती गठित करण्यात आली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ अंतर्गत कलम ८ अनुसार राज्य भूजल प्राधिकरण यांनी दि. ०२.०८.२०१५ च्या आदेशान्वये प्रथमत: राज्यातील अतिशोषित व शोषित अशा ८० पाणलोट क्षेत्रामधील समाविष्ट गावांमध्ये कृषि व औद्योगिक वापरासाठी ६० मीटर पेक्षा जास्त खोलीच्या विंधण विहिरी / कूपनलिका खोदण्यास पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**बीड जिल्हयात पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांचे वाटप झाले नसल्याबाबत**

**(४०) २३०५७ (३१-०७-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात सन २०१३ मध्ये अपु-या पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण झाली असताना नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी गावपातळीवर विविध सामाजिक संघटना आणि व्यक्तींनी दिलेल्या पाण्याच्या टाक्या काही पुढा-यांकडे असल्याची बाब माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे पाण्याच्या टाक्यावरुन वाद निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदी प्रदुषित झाल्याबाबत**

**(४१) २३३५० (३१-०७-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीच्या पात्रात इकॉर्निया नावाची वनस्पती मोठ्या प्रमाणात साचली आहे या वनसंपत्तीमुळे नदीचे पाणी दुषित झाले असून मानव व प्राणी, मासे यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुषित पाणी व वनस्पती यांचे नमुने तपासणी करिता प्रयोगशाळेकडे पाठविले आहे काय,

(३) असल्यास, सदर तपासणी अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-०९-२०१५) :** (१) वैनगंगा नदीच्या पात्रात काही प्रमाणात इकॉर्निया या वनस्पतीची वाढ झाल्याची दिसून येते. तथापि, वनस्पतीच्या वाढीमुळे मानवी आरोग्यावर, प्राणी व मासे यांच्यावर परिणाम झाला, हे खरे नाही.

(२) व (३) म.प्र.नि.मंडळातर्फे वैनगंगा नदीच्या पाण्याचे नमुने राष्ट्रीय जल निगराणी योजने अंतर्गत (NWMP) नियमितपणे संकलीत करण्यात येतात व पृथ्थ:करण अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती येथील शासकीय तंत्र माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्‌यालय येथे कंम्प्युटर सायन्स व इलेक्ट्रॉनिक्स या विषयाचे अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत**

**(४२) २३८३९ (३०-०७-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील शासकीय तंत्र माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्‌यालय येथे कॉम्प्युटर सायन्स व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय सन २००५ मध्ये होवूनही अद्‌यापपर्यंत हे अभ्यासक्रम सुरु झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जुलै, २०१५ पासुन हे अभ्यासक्रम सुरु करावेत अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने उक्त महाविद्‌यालयात सदरील विषयांचे अभ्यासक्रम सुरु करण्यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील अतिरिक्त प्राध्यापकांच्या समावेशनाबाबत सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई यांनी माहिती देण्यास केलेल्या विलंबाबाबत**

**(४३) २३८४१ (३१-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिरिक्त प्राध्यापकांच्या समावेशनाबाबत सहसंचालक, उच्च तंत्र शिक्षण, मुंबई यांना मा. लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी माहिती जाणून घेण्याबाबत दिलेल्या पत्रास संबंधित अधिकाऱ्यांनी ६० दिवस उलटून गेल्यानंतरही उत्तर दिले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त माहिती न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मा. सदस्यांच्या माहिती जाणून घेण्याच्या अधिकारास बाधा आणल्याबाबत शासनाने कोणती उपायोजना केली आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५)** :(१) सहसंचालक, उच्च शिक्षण,मुंबई यांनी दिनांक २५/०८/२०१५ च्या पत्राने मा. लोकप्रतिनिधींना उत्तर दिले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रस्तूत प्रकरणी मा. विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेली माहिती सहसंचालक,मुंबई यांनी विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्याचे निदर्शनास आले असून सामान्य प्रशासन विभागाचे क्र विमंस/२०१३/प्रक६७/१८(र.व.का.) दिनांक २७.०७.२०१५ अन्वये लोकप्रतिनिधीकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहार व इतर अनुषंगिक बाबींच्या संदर्भात विहित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन कटाक्षाने करण्याबाबतब संचालक/सहसंचालक यांना कळविण्यात आले आहे.

---

**राज्यात चायनीज ठेले व उघडयावरील अन्नपदार्थ विक्री तसेच बनावट शीतपेये यांची सार्वजनिक विक्री होत असल्याबाबत**

**(४४) २३८६२ (०६-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मॅगीवरील घातलेली बंदी पाहता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून मोठया महानगरातील चायनीज ठेले व उघडयावरील अन्नपदार्थ विक्री तसेच बनावट शीतपेये याची सार्वजनिक विक्री याबाबत स्टॉल माफियांच्या दबावामुळे अद्यापि कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे मुंबईकरांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न आस्थापनांच्या नियमित तपासण्या करण्यात येतात व अहवालातील त्रुटींच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेतील ८० टक्के वॉटर फिल्टर बंद असल्याबाबत**

**(४५) २४५८० (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळावे या करीता प्रत्येक शाळेत “जलमणी” योजनेतून पाणीपुरवठा विभागाने वॉटर फिल्टर बसविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्यात क्लोराईडयुक्त घातक क्षार असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून शासनान लाखो रुपये खर्चुन हे वॉटर फिल्टर बसविण्यात आले मात्र अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ८० टक्के वॉटर फिल्टर बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे. जिल्ह्यामध्ये एकूण २१०९ प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी ४४१ शाळांमध्ये जलमणी सयंत्र २००९-१० ते २०११-१२ ह्या वर्षात बसविण्यात आले आहेत

(२) व (३) हे खरे नाही. तथापि, बसविण्यात आलेल्या सयंत्रापैकी ६० टक्के सयंत्र सुरु आहेत. १३९ संयत्रे बसवून ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. काही संयत्रे विद्युत देयके प्रलंबित असणे, शाळा स्थलांतरित होणे व इतर बिघाडामुळे बंद आहेत वारंवार आढावा घेऊन सयंत्रे सुरु करुन घेण्यासाठी जिल्हा परिषद, यवतमाळ मार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे, तसेच सद्य:स्थितीत २५९ सयंत्रांमधून विद्यार्थ्यांना शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ललित कला केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(४६) २४९३५ (३१-०७-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या ताब्यातील सुमारे १५ एकर जमीन महाराष्ट्र कला अकादमीला व ५.०२ एकर जमीन ललित कला अकादमीचे विभागीय केंद्रासाठी हस्तांतरीत करण्याचा शासन निर्णय १९९२ ला झाला असतानाही महाराष्ट्रात सदर प्रस्तावित केंद्राची स्थापना झाली नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, प्रत्येक राज्याचे ललित कला केंद्र आहेत परंतु महाराष्ट्र शासनाचे चित्रकला, शिल्पकला व मुद्रकला साठी असे कोणतेच केंद्र नाही, असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर केंद्रांची स्थापना करण्यासाठी कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१५) :** (१) हे अशत: खरे आहे.

महसूल व वन विभागाने दि. १० मार्च, १९९२ च्या ज्ञापनान्वये १५ एकर जमीन महाराष्ट्र कला अकादमीला व ५.०२ एकर जमीन ललित कला अकादमीचे विभागीय केंद्रासाठी

हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला होता. तथापि सदर निर्णय महसूल व वन विभागाने दि. २२ डिसेंबर, २००० च्या शासन ज्ञापनान्वये रद्द केला.

(२) इतर राज्यातील केंद्राबाबत माहिती उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासनाचे असे कोणतेही केंद्र नाही.

(३) ललित कलेच्या प्रचार व प्रसारासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र कला संचालनालय कार्यरत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर चित्रपट करण्यासाठी दिग्दर्शकांनी अनुदान घेऊनही चित्रपट निर्मिती केली नसल्याबाबत**

**(४७) २५४७९ (३१-०७-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर चित्रपट करण्यासाठी दिग्दर्शक विनय धुमाळे यांनी केंद्र शासनाकडून अडीच कोटी रुपयांचे आणि राज्य शासनाकडून ५० लाख रुपयांचे अनुदान घेऊन पंधरा वर्षांनंतरही चित्रपट निर्मिती केली नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चित्रपटाकरिता शासनाने अनुदान दिल्यानंतर सदर प्रकल्पाचे काय झाले याचा पाठपुरावा शासनाकडून करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :** (१) विनय धुमाळे यांनी केंद्र शासन व राज्य शासन या दोहोंकडून अनुदान मिळविले ही बाब मे, २०१५ मध्य निदर्शनास आली. या अनुदानातून त्यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर चित्रपट निर्माण केला आहे.

(२) होय.

(३) चित्रपट मराठी व इंग्रजी भाषेत निर्माण करण्यासाठी शासनाने अर्थसहाय्य दिले होते. मात्र चित्रपट मराठीत निर्माण केलेला नाही. चित्रपटाचा दर्जा सुमार आहे व निर्मात्याने चित्रपटाचे प्रदर्शन केलेले नाही ही कारणे लक्षात घेता शासन अर्थसहाय्याचा हेतू विफल झाल्याच्या कारणास्तव शासकीय अर्थसहाय्य वसूल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राधानगरी व भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तलावांचे संवर्धन करण्याकरिता निधीची मागणी केल्याबाबत

**(४८) २६८२१ (३१-०७-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील गावातील तलावाची अवस्था दयनीय असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राधानगरी व भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तलावांचे संवर्धन पर्यावरण विभागाच्या अनास्थेमुळे दुर्लक्षित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री यांचेकडे तलावांचे संवर्धन करण्याकरिता निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ग्रामीण तलावांच्या संवर्धनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०१-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. ग्रामीण भागातील जलस्त्रोतांचे (तलावांचे) संवर्धन करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे.

(३) होय, हे खरे आहे.मा.आमदार प्रकाश आबिटकर यांनी दि. १ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये याबाबतची मागणी केली आहे.

(४) व (५) राधानगरी व भुदरगड तालुक्यातील तलावांचा समावेश राज्य सरोवर संवर्धन योजनेमध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार विहीत नमुन्यात सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे. प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यात धान्य व रॉकेल वाटपात होत असलेल्या गैर प्रकाराबाबत

**(४९) २७१५२ (३१-०७-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात धान्य व रॉकेल वाटपात गेले अनेक महिन्यांपासून सुरु असलेल्या गैर प्रकाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांना दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेटून सविस्तर निवेदन देऊन माहिती दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागण्या कोणत्या आहेत व त्यावर प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार देशातील सर्व राज्यात माहे फेब्रुवारी, २०१५ पासून अंमलबजावणी सुरु होऊनही वसई तहसिल कार्यालयाने अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-१०-२०१५) :** (१) होय.
(२) सदर निवेदनामध्ये वसई तालुक्यामध्ये दक्षता समितीची स्थापना व त्यांच्या बैठका होत नसणे, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या रास्तभाव दुकाननिहाय प्रसिध्द केल्या नसून वितरण व्यवस्थेबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारी असणे, धान्य शिल्लक असताना देखील धान्याचे कमी वाटप केल्याचे दिसून येणे, अंत्योदय लाभार्थ्यांना देय असलेल्या धान्यापैकी काही धान्य इतर योजनेत वर्ग करणे, बंद दुकानातील लाभार्थी इतर दुकानास जोडण्याबाबत हयगय करणे. रॉकेल आणि साखरेचा कोटा लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसणे इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत.

सदर निवेदनावर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या स्तरावर संबंधित लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे.

(३) वसई तालुक्यामध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात आली असून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे अजीवली (फौजदारवाडी) (ता.राजापूर जि.रत्नागिरी) येथील पाणी पुरवठा योजना बंद केल्याबाबत**

**(५०) २७५०१ (२९-०७-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अजीवली (फौजदारवाडी) (ता.राजापूर जि.रत्नागिरी ) येथे शासनातर्फे गत ३ वर्षापासून सुरु असलेली पाणीपुरवठा योजना सदर ग्रामपंचायतीने माहे एप्रिल, २०१५ पासून बंद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना अचानक बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही
(२) व (३) मौजे अजीवली (फौजदारवाडी) (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नळ पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आली असून सदर योजना

दि.३०.५.२०१३ रोजी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आली आहे. योजनेच्या विद्युत पंपामध्ये तांत्रिक बिघाडामुळे दि.३१.३.२०१५ ते ६.४.२०१५ या कालावधीत योजना बंद होती. मात्र ग्रामपंचायतीमार्फत सदर तांत्रिक बिघाड दुरुस्त करुन दि.७.४.२०१५ रोजी योजना पुर्ववत सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.